# भाव माझ्या अंतरीचे

काव्यसंग्रह


कवि :

**सद्‌गुरु प्रभू**

सावंतवाडी





संपादन व प्रकाशन : गुं. फ. आजगांवकर

प्रबोधन रिसर्च असोशिएट्स, १७ के. जी. बी. निवास

गिरगांव, मुंबई ४०० ००४.

प्रकाशक : **गुं. फ. आजगांवकर**
१७ के. जी. बी निवास
गिरगांव, मुंबई ४०० ००४.

कवि : **सद्‌गुरु प्रभु**
१५ फ., सालईवाडा
राणी पार्वतीदेवी हायस्कूलजवळ
सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

प्रसिद्धी : जून १९८४.

**किंमत ५ रुपये**

मुद्रक : **य. गो. म्हात्रे**
नरेश मुद्रणालय, अलिबाग
जि. रायगड.

# प्रास्ताविक

सद्‌गुरू प्रभू हे कोकणचे. सावंतवाडीस राहतात. शिक्षण-विस्तार अधिकारी म्हणून रत्नागिरी जिल्ह्यात त्यांची कारकीर्द विशेष गाजली. १९४२ मध्ये ते पोष्टात नोकरीस होते. पुढे मुंबईच्या सेंट्रल टेलिग्राफमध्ये तारमास्तर म्हणूनही त्यांची कारकीर्द यशस्वी झाली. आजारापणामुळे मुंबई सोडून रत्नागिरी जिल्हा बोर्डामध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून बरीच वर्षे काम केले बी. ए., बी. एड्. झाल्यावर सिनियर शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून त्यांची बढती झाली. मातृभक्त, शिस्तप्रिय आणि नॉन करप्ट अधिकारी म्हणून मान्यता पावले.

आईच्या विशेष आजारापणात तिची सेवा करता यावी म्हणून मुदतपूर्व सेवानिवृत्ती स्विकारली. हल्ली सावंतवाडी येथे स्थायिक असून परमेश्वरचिंतनात व नामस्मरणात आपला वेळ व्यतीत करतात. 'सोऽहं ध्यान तरंग' आणि 'ओवी नामामृतसार' ही त्यांची छोटी पुस्तके गेल्या वर्षी प्रकाशित झाली. १९५५ मध्ये वयाच्या ३० व्या वर्षी त्यानी लिहिलेल्या काही कविता जुन्या पत्रव्यवहारात पडून राहिलेल्या सापडल्या. ह्या कवितांचा ढंग, प्रसादपूर्ण शैली, मनाला आकर्षित करते. म्हणून ह्या कवितांचा आस्वाद मुळातूनच घेणे रास्त आहे.

हा काव्यसंग्रह रसिकाना विशेष आनंद देईल असा मला विश्वास वाटतो.

—गुं. फ. आजगांवकर

# समर्पण–

हा काव्यसंग्रह परमपूज्य मातोश्री शांताबाई हिच्या पवित्र स्मृतीस अत्यंत नम्रभावाने अर्पण करीत आहे.

–सद्‌गुरू प्रभू

# ते कोठे ?

जे स्फुरले
ते लिहिले
जे विरले
ते उरले.

ना येथे
ना तेथे
ना व्योमी
ना धामी !

ना ओठी
ना पोटी
ना ध्यानी
ना कानी !

आहे ते
कोठे ते ?
पुसुनि बघा
शून्या ते ! !

# सह्य नगान अन् अरबीने

मला तुम्हा दिले कोणी ?
दिले मातेने पित्याने
दिले बंधूने श्रीहरीने
बहु अंतरीच्या प्रेमाने

मला तुम्हा दिले कोणी ?
प्रकाशाने, अंधाराने
जीवनाच्या ध्रुव ताऱ्याने
पूर्वेने अन् पश्चिमेने !

मला तुम्हा दिले कोणी ?
दिले श्वासाने, ध्वनीने,
दिले सृष्टीने, दृष्टीने
सह्य नगाने अन् अरबीने !

# मुक्तछंदातील जग

जग असेच आहे
जग असेच आहे !
ओरबडलेल्या नखांचे
खड्डे पडलेल्या गालांचे
भोंकाळ डोळयांचे, किडलेल्या दातांचे
रक्तामासाच्या चिखलाचे
हाडांचे, काठयांचे, काटयांचे
जग असेच आहे
जग असेच आहे !!

सह्य अरबीमधील धुक्याचे
त्या खालील मातीचे अन् दगडांचे
काळया श्वानांचे अन् तांबडया बैलांचे
पिकलेल्या अन् सुकलेल्या पर्णांचे
कुरकुरणाऱ्या रहाटाचे
पिरपिरणाऱ्या म्हातारीचे
जग असेच आहे
जग असेच आहे !!!

## तृप्त कोण करणार ?

नकोत गाद्या प्रासादांची, नाही जरुरी अम्हा
झोपू पर्णावरी, गृहांची नाही आम्हा तमा
बंद करा तो गौरव अमुचा, गळी घालणे हार
परवडल्या त्या शिव्या अम्हाला, समजू ओव्याभार
वरदानाचे नाही भुकेले, घाला आम्हा शाप
उःशापांची भीकच घेणे, समजू आम्ही पाप
नको आरती, नको निरांजन, नको नको काही
विश्वाचे हे वैभव सारे; नका देऊ काही
छत्र निलांबर दोन्ही पदांची भूमि नच मिळणार
इच्छा अमुची देण्याची ती तृप्त कोण करणार !

## पय गळले

झिक् ! झिगुनि कनक धार
घट छिद्रुनी पय गळले
होई दूर नयन पटल
पूर्व क्षितिजी निर गळले
स्पर्शुनि ते सप्ताब्धिस
अचपल मेदिनी शिरले
पादप आंत्री विरुनि
पुष्पफली फडफडले
फल सेवुनि ते उडले
पूर्वेच्या धारेवर
घट छिद्रुनि पय गळले
झिक् ! झिगुनि कनकधार

# त्रिभुवन होईल शांतिनिकेतन

सखी मज पडले स्वप्न मनोरम ।।धृ।।
स्वप्नी पाहिले तुझ्या जननीचे कणाकणांचे त्यागी जीवन
दिधले दुग्ध सुधामृत तुजला
श्रमली झिजली तुझ्या सुखाला
जागृत राही दिवस रात्रीला
तुझिया डोळी तुझ्या पापणी चित्त तिचे ध्यानाचे आसन
सखि मज पडले स्वप्न मनोरम

पर्जन्यातुनि चिंब होऊनि
सूर्याच्या करपत्या उन्हातुनि
गारठणाऱ्या थंडीमधुनि

क्षुधा शमन तव ध्यास तिला हा, त्यासाठी करी सर्व समर्पण
सखि मज पडले स्वप्न मनोरम

विकास त्या अक्षय यज्ञातून
तुला लाधला त्या प्राणातून
प्राप्त जाहले तुलाच यौवन
तुला त्यागुनि ' कन्या दानी ' गृह झाले इंद्राचे भुवन
सखि मज पडले स्वप्न मनोरम

ते श्रद्धेचे पावन जीवन
दिसले मजला तव नयनातून
वाहत राहील विश्वाअंती
तव हृदयातील प्रेमामधुनि त्रिभुवन होईल शांतिनिकेतन
सखि मज पडले स्वप्न मनोरम !

# पंचशील

घोष चाले हा कशाचा ?
नित्य कानी ऐकतो

संदेश लिहिता तो कशाचा
नित्य आम्ही वाचतो

ऐकतो सहजीवनाचा
मंत्र भूतकालातूनी

परिचित आहे तो अम्हाला
बुद्ध येशूपासुनी

गाडी खटारी, बैल जोडी
सत्य हे सहजीवन

शक्ती खटारिस बैल देतो
मिळतेच त्या धान्य तृण

बैल पुढती गाडी मागे
हेच शाश्वत सत्य हो

पंचशीलेमधुनि आहे
हे प्रमेयची उलट हो.

## तीर्थ हासे

तुझ्या भक्तीमध्ये–माझी श्रद्धा वसे
तुझ्या श्रद्धेमाजी–अमाप स्फूर्ती असे
तुझ्या तपाचरणी–माझे ध्यान राहे
तुझ्या ध्यानामध्ये–माझी ज्ञप्ती वाहे
पूजेच्या तबकी–माझे पुष्प वसे
संध्येच्या पळीत–माझे तीर्थ हासे.

## नित्य मी तेथे असे

नित्य मी तेथे असे
जेथे मन उन्मन होतसे

नित्य मी तेथे वसे
जेथे जप अजपा होतसे

नित्य मी तेथे असे
जेथे समाधान वसतसे

नित्य मी तेथे वसे
जेथे सोऽहं भाव असे

नित्य मी तेथे असे
जेथे मी असुनी मी नसे.

# उलटे सुलटे

निद्रित कौले उलटी सुलटी
परस्पराना घट्ट बिलगली
मनुजाना संरक्षण देण्या–
किटकाना संरक्षण देण्या !

सहस्ररश्मी झरोक्यातुनि–
सहस्र प्राणी उलटे सुलटे
ऊर्ध्व अधर ते विहार करिती
मनुजा धरण्या त्यास मारण्या !

बुद्धि भावना उलटी सुलटी
वास करीते मानव शरीरी
कधी करी ती त्याचे रक्षण
कधी आणी ती त्याच्या मरणा !

जीवन आहे उलटे सुलटे–
धैर्यभीती धाग्याचे विणले !
या धाग्यातुनि मुक्त होऊनि
पाहु अमुच्या जनना मरणा !!

# अशरीरिणी मज वदली

थडग्यावर मी बसलो
पुसीले मी पर्णांना !
का गळता का झडता ?
रडता का थडग्यावर

डोंगर अब्धी लहरी,
फेसाळती वाऱ्यावर !
गर्जुनि अन् घोगावुनि
आदळती पायावर !

रौप्य कडा मेघानो
का बसला रेंगाळत ?
कृष्ण हृदय तुमचेही
द्रवले या थडग्यावर !

‘ ना थडगे ही समाधि ’
अशरीरिणी मज वदली;
‘ अखिलांच्या मुक्तीस्तव–
उर्वरित आयु व्यतित ’!

# कढत अर्घ्य घामाचे देता

अर्ध वर्तुळी अनल चेतुनी–
पूर्ण वर्तुळी वन्हीं पेटतो !
संसृतीमधल्या वर्तुळातुनि–
विराम घेतो झोपी जातो

कुटीरामधुनि अनल पिचूनी–
कुटिराला तो स्वये भक्षितो !
हाव वाढते त्याची याहुनि–
कुटिराच्या तो अस्थी चघळतो !

प्रासादातील वन्ही चेतुनि
स्वप्नी पेटतो स्वये पेटतो
पेटुनि पेटुनी पिचुनि आपण–
दुज्यास तो निज जागा देतो !

गगनी हासतो असाच अग्नी
पोळुन टाकी वसुंधरा तो !
कढत अर्घ्य घामाचे देता
विशाल अब्धी बुडी मारतो !

# प्रश्नचिन्ह ?

ढेकर देऊनि वृषभ झोपला
नव्हती बिछायत त्याला विपिनी
तरुफल दडुनी कुशीत त्याच्या—
स्थिर जाहाले अखिल दिशांनी !

अचल स्थैर्यी त्या चलनची होते
होते चावत, होते धावत
असंख्य श्वासी अन् उच्छ्वासी—
जीवन होते झोपत जागत !

जगणारे जे होते जीवन—
करीत होते मृत्यु तयारी
झोपी गेले होते जीवन;
उठेल आता जीवन सागरी !

नव्हती जाणीव त्या कोणाला—
नियती पडली होती घोरत !
प्रश्नचिन्ह परि भाली तियेच्या—
अदृष्ट होते वलये कोरित !

# कोटी धाग्यानी धाग्यानी

भली सृष्टीची टकळी
फिरते हो रात्रंदिन
पूर्व पश्चिम फिरते—
फिरवितो घनःश्याम !

रवी पेळू आहे हाती
धागे निघती अनंत
गुंडाळुनी त्या धाग्याना—
वस्त्र निर्मी भगवंत !

चराचरांच्या ह्या वस्त्री
प्रवेशतो नारायण
कोटी धाग्यानी धाग्यानी
पांघरतो पंचप्राण !!

# सोऽहं पंढरपूर

जरी दिसतो व्यवहारी
परी वसतो पंढरपुरी
हे सोऽहं पंढरपूर
होई विठूचा गजर
आम्ही दिसतो जरी कर्मठ
असू मूर्तिमंत वैकुंठ
शिव शक्ती आम्ही असू
सोऽहं भावे अंतरी वसू.

## उगवून मावळते

त्याच्या अश्राप कायेने,
ठावे कोणा काय केले
कुठे पेटे हो विजेरी ?
उणे दीप्ती सारे दिसले
त्याच्या रुपेरी ज्वराने–
ध्रुवदार उघडिले
दावी अंशाना अंकाना
पृथ्वी समांतर केले !
डोळी सलील हो लाल
पापण्याना बिलगते;
काठाला हो ते टेकते
उगवून मावळते !

## नित त्याला तू स्मर

तुझा तूची ईश्वर
मनुजा तुझ्यात परमेश्वर
सोऽहं भावे जागृत त्याचा
निदिध्यास तू धर
त्रिपुटीचा लय सहज साधुनि
दुःख ताप तू हर
जाणीव स्पंदन सूक्ष्म करूनी
नील ज्योति दीप भव
चिदानंद आनंद तुझे रूप
नित त्याला तू स्मर.

## निर्मी घन अवसेला

लाटलेले हीमजल
बंदिस्त हो ठेवियेले

अधरीच्या धरा तेले-
विश्व छोटे उजळले !

हाती विश्व कधी येते
कधी लागत खुंटीला

कधी उचकी लागोनी-
निर्मी घन अवसेला !

## नित्याचाही नित्य

नित्याचाही नित्य- नित्य सर्वानंद
नित्य प्रेमानंद- निर्विकार ।
विशुध्द ज्ञानरूप- अनाद्य अनंत
कार्यकारणातीत सर्व साक्षी ।
अजर, अमर, अभय, अक्षर
नित्य ज्ञानात्मक- अविनाशी ।
आनंदात्मक नित्य- नित्य निरवयव ।
शक्ती प्रकाशक- सर्व व्यापी ।
ऐसा तो प्रकाश- सबाह्य अभ्यंतरी
सोऽहं भाव धरी- आत्मानंदे ।

# चिंतन तत्त्वाचे करिती

काटे फिरती सभोवताली
संचित शक्तीने

काटे खुपती सभोवताली
निसर्ग लहरीने

काटे दर्शविती कालाला—
काटे काट्याना मिळती !

काटे दाखविती मापाला
काटे डोक्यां कळ देती !

सागरी असती पोहत काटे
मनुजा पोटी कधी शिरती !

करार होती काट्यावर
अन्—वाटाघाटी फिसकटती !

काटे अणूची चर्चा करुनी
काटे काट्याला गिळती

काटे घोषिती युद्धाला
अन् चिंतन तत्त्वाचे करिती !

## जगा जगू द्या !

पथ वाहुनि नेतो अगणित त्या प्रेताना
पथ तोलुनि घेतो विचार संघर्षांना
ही प्रेते खपती पै पासूनि रुपयात
ती जळती सरणी वखवखत्या पोटात ।।१।।

ही पोटे खेचती जाळी सागरकाठी
तुटुनि ही पोटे पडती सौद्यासाठी
जगी सौदा चाले तगमगत्या प्राण्यांचा
अन् 'जगा जगू द्या' मानव करी हाकाटी ।।२।।

## रात होई दिन

सोऽहं प्रकाशात
गातो दिनरात
रामकृष्ण गीत
मनोभावे ।

रात होई दिन
भूमी भासमान
सोऽहं भावे मन
मनातीत ।

माझ्याविना काही
अन्य दुजे नाही
द्वैत नुरे देही
चिदानंद ।

# गाली हसते

बिन्दुजलाच्या मागे होते
होते शोभत, होते विलसत
इंद्रधनु जन ज्याला म्हणती–
होते मुरकत, होते दिपवत !

इंद्रधनु हे नदीजली रमुनि–
सौरभ लहरी काठी नेते !
टवटवी घेऊनी पुलकित होऊनी–
निज स्थानाला अचुक हेरते !

दिसे इंद्रधनु किती मनोहर
केशबंधनी नर्तन करते
थुई थुई नाचे किती चेतोहर !
भान हरविते गाली हसते !

# चेतना तव स्वस्थ कैसी ?

शिखर चढुनि पार करण्या
चरण उचला क्षणी क्षणी !

अस्वस्थ का आरोग्य असुनि–
झोप का ती निशिदिनी ?

दशदिशा तुम्ही कसुनि शोधा–
असति नयना उघडुनी !

अज्ञान का विद्या असोनी–
मौन का ते प्रतिक्षणी ?

मृत्तिका निर्जीव फिरते–
भोवती चंडांशुच्या;

चेतना तव स्वस्थ कैसी–
अंकावरि सतिसृष्टीच्या ?

ध्यास घ्या अन् सिद्ध व्हा–
तुम्ही झेप घ्या व्योमातुनी

शिखर चढुनि पार करण्या
चरण उचला क्षणी क्षणी !

# खंगत मेले

हिरवे पाणी, हिरव्या गवती
डोंगर अस्वल बसले होते
मानवंदनी, खडे माड ते–
मानवंदनी ‘ ख ’ यान भ्रमते !

गीत सनईचे, ये अंगावर
कलकलणाऱ्या नील रवातुन–
कस सोन्याचा ये अंगावर
ये अंगावर घन मेघातून !

कासारातील संचित जीवन
होते अडले, बळे अडविले !
बहिष्कृत का केले त्याला–
केले हरिजन झाले हरिजन !

दिवस जागले रजनी झोपल्या
जीवन गेले महीत रमले !
अभाव जाणुनि अन् जाणवुनि–
अस्वल वैभव खंगत मेले !

# ती धूळ लावा

नाद गुरगुरे, गती सरकली
राळ उडाली धूळ उडाली
चमत्कार तो कसला तेथे ?
धूळ निमाली हवा निवळली

धूळ लागते गतिच्या मागे
गती शोधते धूली पथाते
या धूलीतुनि या गतीतुनि
जनी तुकयाचे अभंग गाते.

समरांगणी जी धूळ उडाली
करिते रक्षण जित जेत्यांचे
ती धूळ लावा गाली कपाळी
आचरुनि व्रत पंडुसुतांचे

# खंत न वाटे--

कृष्ण रजनीने नयन उघडिले
कवटाळुनी चावऱ्या थंडीला
श्रवणी गेले श्वान भुंकणे
चिरूनि गोधडी हट्टी थंडीला

येई कुकारा उड्या मारूनी
स्वार होऊनी समीरणावर
प्राजक्ताचा सौरभ शिंपी
तगमगणाऱ्या कृश जीवावर

कुरवाळी मज चहू दिशातुन
गान अखंडित रातकिड्यांचे
सळसळणाऱ्या तरुपर्णातून
येई घोरणे जिवा शिवाचे

या श्वसनातुन या गंधातुन
नित जगतो मी जगणे मरणे
खंत न वाटे या जगण्याची
जीवनी मधुरतम असले जगणे.

## नसेलही म्हणू कसे ?

कुट्ट काळ्या काळोखात–पाऊले वाजली
दुधाळ त्या कौमुदीत–पाऊले देखीली
घनदाट झाडीमध्ये–ऐकल्या मी टाळ्या
क्षणामध्ये कृष्ण रात्री–विरल्या त्या साऱ्या

चंद्रभागा वाळवंटी–पाऊले अनेक
अनेकात तुझेसुध्दा–असेलही एक
नसेलही म्हणू कसे–टाळ वाजताती
घनदाट वाळूमध्ये–टाळ्या वाजताती !

## चिदानंद–आनंद

मी भावतो लाट येते नि जाते
मी पाहतो रात्र येते नि जाते
मी पहातो दिन येतो नि जातो
सर्वत्र मी सूर्य दिनरात उरतो.

मी पहातो भोग येती नि जाती
मी पहातो रोग रोगेच मरती
मी राहतो सर्व येती नि जाती
'मी-तो' असा भाव मत् नित्य चित्ती.

स्वात्मप्रकाशी मी नित्य आहे
ना जन्म ना मृत्यु पदी ब्रह्म राहे
ना नाम ना रूप नाकार माते
चिदानंद आनंद हे सारे उरते.

## अल्प अनला चेतवा

जा कुठेही व्हा कसेही ना तुम्हा कोणी पुसे
केसरी परि गोड ठेवा जेथ तुम्हा 'श्री' दिसे

शब्दवल्ली भ्रमर पेरा घोळ मधु अन् गोड व्हा
तो मकरंद सेवुनि तुम्ही तृप्त व्हा अन् मुक्त व्हा

राज्य तुमचे राजसत्ता न्यायदेवी राबवा
विस्मरा बुध्दा अशोका विस्मरा तो नागवा

पिचत पडल्या गोरगरिबा सोपुनी दुहिमाजवा
अल्प अनला चेतवा अन् क्रांतीचे तुम्ही स्वामी व्हा.

## स्वयंभू दीप

प्रेमात आहे आत्मज्ञान
प्रेमात आहे आत्मदर्शन
प्रेमात आहे अधिष्ठान
भगवंताचे ।

प्रेम करावे वृक्षवेलीवर
प्रेम असावे पशु पक्षांवर
प्रेमे पहावा विश्वव्यवहार
विश्वात्म्याचा ।

विश्वप्रेम असे भक्ती
भक्ती प्रेम बने शक्ती
शक्ती पैल विनावाती
स्वयंभू दीप ।

# यशोमंदिराच्या वाटेवर

तो चढला हे कळले; पण कसा चढला ?
थर्मामिटरमध्ये पारा चढतो
पाडपी माडावर चढतो
नदीचे पाणी वर चढते
शिडीवर आपण चढतो
तसा तो चढला काय ?

तो चढला तरी कसा ? काही कळले नाही
लोक मात्र कुजबुजतात......
' मी पाहिले '... ' आम्ही पाहिले '
' त्याने पाहिले ' ' त्यानी पाहिले '

पण तो कसा चढला हे मात्र कुणीच सांगत नाही
शांतता कसली ? पुन्हा कुजबुज कसली ?
' तो सपशेल पडला !'

कौलावरून पावसाचा उरला सुरला थेंब पडतो
निवडणुकीत ' उमेदवार पडतो '
माडावरील नारळ वाऱ्याने पडतो
केळयाच्या सालीवरून माणूस घसरतो
लहान मूल चालताना पडते
तसा तो पडला काय ?

तुमचा धिक्कार ! तुम्ही असून नसल्यागत जमा !
तो गतिमान आहे
तो चढेल वा पडेल; पण–
यशोमंदिराच्या वाटेवर तोच असेल !

# ती अमर आहे !

तुम्ही पाहता ती माझी सावली आहे
प्रकाशानेच तिला जन्म दिला आहे
अन्यथा प्रकाश तिचे अस्तित्व नाकारील
पण ती अमर आहे !

ती जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी आहे
जमिनीवर आहे, प्रकाशात आहे
दरीत आहे, डोंगरात आहे
नदीच्या पात्रात आहे.

आगगाडीच्या रुळावर आहे
परमहंस, विवेकानंद, नेहरू यांच्या अंतःकरणात ती आहे
कारण प्रकाशानेच तिला जन्म दिला आहे.

## कुणासाठी ?

हे कल्पवृक्षा,

तुझ्या अनेक भाईबंदाना मी निरनिराळ्या
ठिकाणी पाहिले आहे.

ध्वजस्तंभासारखे सरळ,
पोंग आलेल्या म्हातारीसारखे,
कृष्णाकाठच्या घाटासारखे,
तुतारीसारखे,
सागराचे, नदीचे, वहाळाचे शेजारी !

धनवान– दानशूर,
ऐन पंचविशीतले,
काही पेन्शनीत गेलेले,
काही शेवटची घरघर लागलेले !
एकमताने सांगतात, प्रतिज्ञेवर बोलतात.

'आम्ही मानवासाठी आहोत'
आम्ही मानवासाठी आहोत ! !

# मातीतच विविधता आहे !

पानांची सळसळ ऐकली
आकार वेगवेगळा आहे

फुलांचे फुलणे पाहिले
रंग वेगवेगळा आहे

फळांचे घोस पाहिले
चव वेगवेगळी आहे

सागराची खोली मोजली
तळ वर खाली आहे

ताऱ्यांचा वेध घेतला
कमी जास्त उंचीवर आहेत

ज्या मातीतून आमच्या डोळ्याना
दृष्टीचा अंकुर फुटला
त्या मातीतच विविधता आहे !

# मी काय समजू ?

कृष्ण आकाशात फुटणारी रुपेरी विद्युल्लतेची नागमोडी चीर,
तुझ्या डोकीवरील केसात केव्हा उमटली ?
मानससरोवरातील जलाशयात खुसकन हसणारी खळी,
तुझ्या गालावर केव्हापासून उमलू लागली ?
रक्त जासवंदीची कळी तुझ्या ओठावर,
केव्हा विराजमान झाली ?
आणि तुझ्या टपोऱ्या डोळ्यातील सोनेरी चांदणी
केव्हापासून चमचमू लागली ?
कभिन्न काळोखात व विजांच्या कडकडाटात
प्रवास करण्याची पाळी तुझ्यावर केव्हा आली होती काय ?
बदक होऊन स्वैरपणे जलाशयावर फिरावे
असे तुला कधी वाटले होते काय ?
लाखो भाविकाना सहज उपलब्ध होणाऱ्या
फुलांचा अभिषेक देवावर वहावा असा विचार
तुझ्या मनात आला होता काय ?
ध्येयवादी माणसाचे जीवन जगण्यासाठी
हवा असलेला मार्ग तुला दिसत असेल काय ?
मी काय समजू !

## एक--दोन

एक–दोन
पावले पुढे पडत आहेत.
पुढे जाऊन एक थांबत आहे··· व
दुसऱ्यास पुढे जाण्यास संधी देत आहे
या सहकार्यानेच तो चालावयास शिकला।
विश्वाच्या उन्नतीसाठी अशा प्रकारचे
परस्पर गोड सहकार्य अपरिहार्य आहे.

## द्वैत लोपे

तू अससी चैतन्यरूप
तू अससी ज्ञानस्वरूप
तू अससी अद्वैत व्यापक
नित्य निरंतर ।

तू अससी असंग अकर्ता
तू अससी निराकार अभोक्ता
तू अससी मुक्त द्रष्टा
विशुद्ध बोध अससी तू ।

तू अससी साक्षीरूप
तैसाची तू प्रकाशस्वरूप
ज्ञान सागर आनंद अमाप
परब्रह्म जगत्‌गुरु ।

# धुक्यामुळे हो वाटे आम्हा

ठिगाळलेले हे इवले घर
धुकाळलेले हे पडके घर
कण्हत आहे खिडक्यांमधुनी
उच्छ्वासातूनी छिद्रामधुनी

रोदन नव्हे हे आत्म्याचे
आक्रंदन हे देहजीवाचे
सृष्टीक्रम हा असाच आहे
देहाला नय तसाच आहे

अरीवर सुटले शर भात्यातून
स्वतंत्र झालो परवशतेतून
पराक्रमाची घडली गीता
साक्षी त्रिभुवन हे वृन्दावन

तपोभूमि ही फार दिसांची
नव्हे आजची नव्हे कालची
धुक्यामुळे हो वाटे आम्हा
विपरीत जीवन उलटे दर्शन

# आमची प्रकाशने

१) **भारतातील शास्त्रांचा उद्गम व विकास**
ले. डॉ. पंढरीनाथ प्रभू. कि. ४१+५ रु. ट. ह.

२) **नटवर्य माधवराव वालावलकर**
(गंधर्व कंपनीचे श्रेष्ठ नट) कि. २५+३ रु. ट. ह.

३) **सोऽहं ध्यान तरंग** कि. २ रु.

४) **नामामृतसार** कि. २ रु.

५) **वेदान्त, धर्म अ‍ॅन्ड सायन्स** कि. रु. १० (इंग्रजी)

६) **सेनापती भोसले** कि. ५ रु. (इंग्रजी)

७) **कोकण रेल्वेकर्ते** अ. ब. वालावलकर कि. १०+३ रु. ट. ख.

८) **प्राचीन मराठी संत कवि, भाग २ व ३**
ले. ज. र. आजगांवकर. पृष्ठे १०००, कि. ६० रु.

९) **कुडाळ देशकर, खंड १ ते ३.** कि. २० रु.

१०) **आजगांव दर्शन** कि. १० रु.

११) **वालावल दर्शन** कि. ५ रु.

१२) **माऊली माझी कृपेची साऊली** कि. ६ रु.

---

पत्ता– १) **गुं. फ. आजगांवकर**, १७ के. जी. बी. निवास
गिरगांव मुंबई ४०० ००४

२) तुकाराम बुक डेपो, माधवबाग, मुंबई ४०० ००४

## प्रत्येकाने संग्रही ठेवावा व नियमित वाचावा असा अमोलिक ग्रंथ

महाराष्ट्रातील विचारवंतांनी गौरविलेला
मराठीतील एकमेव ग्रंथ

# भारतातील शास्त्रांचा उद्गम आणि विकास

: लेखक :

**डॉ. पंढरीनाथ प्रभू**

(पृष्ठसंख्या ३०४+१६)
सवलतीची किंमत ४१ रु.

## आजच मागणी करा. थोड्याच प्रती शिल्लक

**प्रबोधन रिसर्च असोशिएट्स**
१७ के. जी. बी. निवास, गिरगांव मुंबई ४०० ००४.